| गट –ब मुद्दा क्र. १ : नागरी सुविधा, पर्यावरण, रस्ते विकास, सुशोभिकरण व विकास आराखडयांची अंमलबजावणी | | | | गुण १५० | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | विषय | कमाल गुण | संकलीत करावयाची मागणी | अभियानाच्या सुरूवातीची दि. २/१०/०८ ची स्थिती | अभियान कालावधीतील दि. १० जुन २००९ पर्यतची स्थिती |
| १ | नागरी सुविधा | | | | |
| १.१ | पर्याप्त अग्निशमन सेवा व उपयोगिता | २० | अग्निशमन दलातील वाहनांची संख्या | एकूण वाहने ५१ | |
| | | | आगीच्या व इतर आपत्कालीन घटना कव्हर केल्या ? | आगीच्या घटना :- २८३<br>इतर घटना :- ५४३ | |
| | | | शहरात पुन्हा पुन्हा आगीच्या घटना घडू नयेत म्हणून केलेल्या उपाययोजना | अग्निसुरक्षेच्या दृष्टीने नागरीकांमध्ये जागृती व्हावी, या हेतूने विविध संस्था, शाळा, महाविद्यालये, कंपन्यां, चित्रपटगृहे, शॉपिंग मॉल्स, तसेच विविध गृहरचना संस्था तसेच नव्याने बांधकाम सुरू असणाऱ्या इमारतींच्या कामगारांच्या वसाहतींमध्ये प्रत्यक्ष जाऊन त्यांना आग प्रतिबंधक उपाययोजनांची माहिती व प्रात्यक्षिके देण्यात आलेली आहेत. तसेच दिनांक १४ एप्रिल ते २० एप्रिल या अग्निशमन सप्ताहाच्या कालावधीत या प्रकारचे माहितीपर कार्यक्रम शहरामध्ये विविध ठिकाणी राबविण्यात आलेले आहेत. | |
| | | | अग्निशमन दलावर होणारा एकूण खर्च कर्मचारी आस्थापनासह | १. कर्मचारी वेतन :- ५,३२,९०,०००/-<br>२. वाहने व उपकरणांची देखभाल दुरूस्ती :- रू.१६,२०,०००/-<br>३. वाहन खरेदी :- ८५,००,०००/-<br>४. इतर खर्च :- २१,३०,०००/- | |
| | | | अग्निशमन सेवांपासून मिळणारे उत्पन्न. | एकूण उत्पन्न रू. ४,२९,४८,०००/- | |
| १.२ | पर्यटन/ऐतिहासिक स्थळे/सामाजिक केंद्र/ग्रंथालये | २० | १ एकूण पर्यटन/ ऐतिहासिक स्थळे यांची संख्या<br>२ ऐतिहासिक स्थळांच्या देखभालीसाठी केलेले प्रयत्न .तपशील द्यावा | २०<br>वश्रामबागवाडा फेज २ काम चालू<br>नानावाडा त्रिशुंड गणपती मंदीर दुरूस्ती काम चालू<br>१५ ऐतिहासिक वास्तुंचे मॉडेल्स काम पूर्ण | |
| | | | ३) स्टेडियम व क्रिडांगणे यांची व्यवस्था व संख्या व त्यापासून मिळालेले उत्पन्न . | १) पं. नेहरू स्टेडियम<br>२) कै. जनरल अरूणकुमार वैद्य स्टेडियम<br>३) कै. बाबूराव सणस स्पोर्टस ग्राउंड<br>हि तिनही क्रिडांगणे पुणे महानगरपालिकेची आहेत.<br>एकूण उत्पन्न ३,४१,१००/- | |
| | | | ५) शहरातील ग्रंथालयांची व पुस्तकांची संख्या | * डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन या ठिकाणी ग्रंथालयामधे सामाजिक, धार्मिक, सांस्कतिक, शैक्षणिक, स्पर्धा परीक्षा, इत्यादी विविध विषयांची २५०० पुस्तके उपलब्ध असून केवळ मासिक रु. १०/- आकारून सर्वा साठी खुले आहे. | |
| | | | ६) स्मशानभूमी / दफनभूमी व्यवस्था | स्मशानभूमी व दफनभूमी येथे वीज, पाणी व टॉयलेट याची सुविधा देण्यात आलेली आहे. वेळोवेळी संबंधीत क्षेत्रिय कार्यालयांतर्गत दुरुस्तीची कामे केली जातात. तसेच २ विद्युत दाहिनी, ५ गॅसदाहिनी, ४ डिझेलदाहिनी नागरीकां साठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | पर्यावरण | २० | (१) पर्यावरण सद्यस्थितीचा अहवाल व त्याची प्रसिध्दी | पर्यावरण सद्यस्थितीचा अहवाल प्रत्येक वर्षी ३१ जुलै पूर्वी मा. मुख्य सभेपुढे सादर करणेत येवून प्रसिध्द करणेत येतो. | |
| | | | (२) पर्यावरणाचा ऱ्हास होवू नये म्हणून पर्यावरण संवर्धन उपाय योजना | पर्यावरणाचा ऱ्हास होवू नये म्हणून त्यासाठी करणेत आलेल्या उपाय योजनांचा तपशिल सोबत जोडणेत आलेला आहे. | |
| | | | (३)आपत्कालीन व्यवस्थापन आराखडा तयार आहे काय | आपत्कालीन व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात आला असून तो तपासणीसाठी आपत्ती व्यवस्थापन कक्ष, मुंबई, मंत्रालय येथे पाठविण्यात आला आहे. तसेच वॉर्ड स्तरीय आराखडा निर्मिती करणेसाठी माहिती मागविण्यात आली आहे. | |
| | | | (४) उपलब्धतेबाबत नागरिकांना माहिती आहे काय | नाही. | |
| | | | (५)शहरातील बगीचे/उद्याने/ तलाव/खुली जागा इ.तपशिल | पुणे मनपाच्या हद्दीमध्ये उद्याने विकसित करणेसाठी ५ वर्षाच्या कालावधीचे नियोजन करण्यात आलेले असून पुणे मनपाने आज अखेर ७४ सार्वजनिक उद्याने विकसित केलेली आहेत. | |
| | | | (६) वृक्ष गणना व लागवड | पुणे शहरातील वृक्षांची गणना सन १९९६-९७ साली घेणेत आलेली असून सदर गणनेनुसार वृक्षांची संख्या ३२,८८,२०५ आहे. | |
| | | | (७) पर्यावरण नियमाची अंमलबजावणी | पर्यावरणाचे नियमांची अंमलबजावणी करणेत येत आहे. | |
| | | | (८)उल्लंघन करणाऱ्यांवर करण्यात आलेली कार्यवाही/दंड वसूली | महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे जतन व अधिनियम १९७५ अन्वये अनाधिकृत वृक्षतोडीबाबत कारवाई केली जाते. | |
| **३** | **रस्ते विकास** | **४०** | | | |
| ३.१ | रस्ते | १० | रस्त्याची एकुण लांबी व रूंदी कॉंक्रीट व अस्फाल्ट / डांबरी कच्चा रस्ता यांचे एकमेंकाशी प्रमाण. | प्रमाण पक्के रस्ते : कच्चे रस्ते ८३% : १७% | |
| | | | मुख्य रस्त्यांची गुणवत्ता | व्यवस्थित | |
| | | | रहिवासी भागातील आंतरीक रस्त्यांची व्यवस्था. अतिक्रमणांपासून मुक्त, टिकावूपणा | रस्त्यांची अवस्था – चांगली सद्यस्थितीत अंशत: अतिक्रमण आहे. | |
| | | | किती टक्केरस्त्यांना स्टॉर्म वॉटर ड्रेन आहेत. | ६२% | |
| | | | रस्त्यापासून खर्च वसूली (टोल अथवा अन्य मार्गाने) | टोल लागू नाही | |
| | | | रस्त्याच्या सजावटीसाठी केलेल्या उपाय योजना | थर्मोप्लास्टीक पेंट, वृक्षारोपण, फलक डिव्हायडर सजावट स्ट्रीट फर्निचर इ. | |
| | | | एकुण रस्त्यापैकी डिव्हायडर्स असलेले रस्ते | २७% | |
| | | | शहरातील सौंदर्यकरण केलेल्या रस्त्यांचा तपशिल | जंगली महाराज रस्ता, गणेशखिंड रस्ता, लॉ कॉलेज रस्ता, सेनापती बापट रस्ता, पटवर्धन बाग रस्ता, गुळवणी महाराज रस्ता, कर्वे रस्ता,पौड रस्ता , भेलकेनगर डी.पी. रस्ता,सिंहगड मुख्य रस्ता,टिळकरोड, कुमठेकर रस्ता, लक्ष्मी रस्ता, पेशवे पथ,नॉर्थ मेन रोड, आंबेडकर रस्ता,पाषाण सूस रस्ता, अभिमानश्री रस्ता, जयकर रस्ता, बाणेर रस्ता, औंध रस्ता,बी.टी.कवे रोड, मगरपट्टा रस्ता, सोलापूर रोड,आळंदी रस्ता, गोल्फ क्लब रस्ता, विमानतळ रस्ता,नॉर्थ मेन रोड, आंबेडकर रस्ता. | |
| ३.२ | फुटपाथ | ८ | एकुण किती रस्त्यापैकी किती कि.मी. रस्त्यावर फुटपाथ आहे. | ७५% | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | फुटपाथचा वापर वाढविण्यासाठी व देखभालीसाठी केलेल्या उपाययोजना | जागोजागी फूटपाथचा वापर करणेसाठी फलक कार्यान्वीत हाणे आवश्यक | |
| | | | पादचाऱ्यांसाठी फुटपाथ खुले ठेवण्यासाठी केलेल्या उपाययोजना. | सद्यस्थितीत अतिक्रमण विरहीत, जेष्ठ नागरीकांसाठी पादचारी मार्ग करण्यात येत आहे. | |
| | | | फुटपाथवर पर्याप्त थुकंदाण्या उपलब्ध आहेत काय? | उपलब्ध होणे आवश्यक | |
| ३.३ | **जंक्शन आयलॉंडस व वाहतुक** | ५ | (१) खाजगी संस्थांच्या सहभागातून उभारलेल्या जंक्शन्स, आयलँडसची संख्या | ० | |
| | | | (२)किती इलेक्ट्रॉनिक ट्रॅफिक सिग्नलस आहेत (एकूण पैकी) | १५५ | |
| | | | (३)वाहतूक नियमनासाठी केलेल्या उपाययोजना, त्यांचा प्रभावपणा | एटीसी,आयटीएस, संगणकीकृत पध्दतीने केंद्रीय कक्षातून वाहतूक नियंत्रण | |
| ३.४ | **स्ट्रीट लाईट** | ७ | **i) प्रति कि.मी. स्ट्रीट लाईटची संख्या** | ४०<br>स्थिर तांत्रिक निकष | |
| | | | **ii) स्ट्रीट लाईटची एकुण संख्या** | ९३६५० | |
| | | | **iii) स्ट्रीट लाईटची संख्या** (अंदाजे या वर्षी बसविण्यात येणारे) | ५७०० पैकी ५०% काम पुर्ण | |
| | | | **iv) स्ट्रीट लाईटच्या गुणवत्तेमध्ये सुधारणेसाठी केलेल्या उपाययोजना** | **स्ट्रीट लाईटच्या गुणवत्तेमध्ये सुधारणा करण्यासाठी केलेल्या उपाययोजना**<br>१) <u>**नविन भागातील व्याप्ती**</u> – पुणे मनपामध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या हद्दीमध्ये असलेल्या टयूब फिटींग काढून त्या ठिकाणी आवश्यकतेनुसार ७० वॅट, १५० वॅट , २५० वॅट फिटींग वॅट फिटींग्ज बसविण्यात आल्या . अशा प्रकारे जवळपास ९९ टक्के काम पूर्ण करण्यात आलेले आहे.<br>२) <u>**लाईटच्या गुणवत्तेच्या स्तरात वाढ करण्यासाठी केलेल्या उपाययोजना –**</u><br>• बी.ओ.टी. तत्वावर एशियन मेक टी ५ एनर्जी सेव्हर टयूब फिटींग्ज, २५० वॅट फिटींग ऐवजी ९६ वॅट व १५० वॅट फिटींग ऐवजी ७६ वॅट प्रत्येकी ७५०० नग असे एकुण १५००० नग बसविण्याचा प्रस्ताव पुर्णत्वाच्या मार्गावर आहे.<br>• ४ X १४ वॅटच्या १२०० नग एनर्जी सेव्हींग टयुब फिटींग्ज बसविण्यात आल्या आहेत.<br>• मध्यवर्ती भागातील उंच असलेल्या पोलची उंची कमी करुन त्यावर नव्याने १५०/२५० वॅट फिटींग बसविण्यात आल्या. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | • २ X २४ वॅटच्या ३००० नग खरेदी करणे प्रस्तावित आहे.<br>• जनेराशपुअ अंतर्गत करावयाच्या कामामध्ये पुणे शहरातील महत्वाच्या रस्त्यांवर अत्याधुनिक प्रकारची प्रकाश व्यवस्था करण्यात आलेली आहे.. सदर प्रकाश व्यवस्था करताना फिडर पिलर्समध्ये जी.एस.एम. सिस्टीम वापरण्यात आली आहे.<br>३) <u>**फिक्सर्चमध्ये वृध्दी**</u> – मध्यवर्ती कोठी कार्यालय विदयुत विभाग यांचेकडून ७० वॅट , १५० वॅट , २५० वॅट अशा स्ट्रीट लाईटच्या फिटींग एकूण १७०० नग खरेदी करण्यात आलेल्या आहेत. त्याचा वापर नव्याने रस्ते प्रकाश व्यवस्था करणे व<br>जुन्या खराब फिटींग बदलणे यासाठी करण्यात आला आहे.<br><br>४) <u>**जंक्शनच्या ठिकाणी लाईटची गुणवत्ता व पर्याप्तता तपासणे –**</u> संपूर्ण पुणे शहरात विविध चौकामध्ये सुमारे ५५० नग हायमास्ट/सेमी हायमास्ट (मेटल हालाईड) सोडियम व्हेपर ) तसेच डेकोरेटिव्ह ज्युनो फिटींग्ज ( ३ आर्मड ंहंडी प्रकार ) बसवून प्रकाश व्यवस्थेत सुधारणा करण्यात आलेली आहे. | |
| | | | **v)** **स्ट्रीट लाईटच्या देखभालीसाठी उपाययोजना व प्रभावीपणा** | <u>**स्ट्रीट लाईटच्या देखभालीसाठी उपाययोजना व प्रवाहीपणा –**</u><br><br>स्ट्रीट लाईटची एकूण संख्या ९३६५० नग<br>स्ट्रीट लाईटच्या देखभालीसाठी उपाय योजना व प्रभावीपणा<br>• जंक्शन बॉक्स बंद आहेत, खांबाना आर्थिंग आहे , तारा तरंगत्या नाहीत.<br>• खांबाना रंग व फिक्सर्चना आवारण आहे. रस्त्यावरील स्ट्रीट लाईट फिटींगसाठी लॉकींग अॅरेंजमेंट असलेला व त्यामध्ये स्वंयचलित घडयाळ तसेच इतर आवश्यक विदयुत साहित्य , म.रा.वि. मडळाचे वीज मीटर बसविलेला फिडर पिलर बसविण्यात येतो. सदर फिडर पिलर पासून स्ट्रीट लाईटच्या पोलवरुन जंक्शन बॉक्स पर्यत योग्य त्या क्षमतेची भूमीगत केबल टाकण्यात येते. तदनंतर जंक्शन बॉक्स पासून स्ट्रीट लाईट फिटींगपर्यत ३/२० वायरने कनेक्शन केले जाते. प्रत्येक खांबाना असलेले जंक्शन बॉक्स बंद असून त्यांना आर्थिंग आहे. भूमीगत केबल असल्यामुळे तारा तरंगत्या नाहीत. खांबाना चंदेरी रंग दिलेला असून फिक्सर्चला आवरण सुध्दा आहे. स्वंयचलित घडयाळामुळे रस्त्यावरील दिवे अॅटोमॅटींक वेळेवर चालू /बंद होतात . याशिवाय अत्याधुनिक इलेक्टॉनिक तंत्रज्ञान वापरून फिडर पिलर बसविण्याचे प्रस्तावित आहे.<br>• देखभालीसाठी पर्यवेक्षणाची प्रभावी यंत्रणा उपलब्ध आहे. पुणे मनपाच्या १४ क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत येणा–या हदीकरिता विदयुत विभागाच्या १४ कोठया असून प्रत्येक कोठीसाठी एका कनिष्ठ अभियंत्याची नेमणूक केलेली आहे. सदर कनिष्ठ अभियंत्याची अधिपत्याखाली दिवे देखभाल व दुरुस्तीसाठी इलेक्ट्रिशियन , असि. इलेक्ट्रिशियन , बत्ती इन्स्टेक्टर ,बत्तीवाला व बिगारी या हुद्दयावरील सेवकांची नेमणूक केलेली आहे. दिवे दुरुस्तीसाठी प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयासाठी हायड्रोलिक क्रेनची व्ययस्था करण्यात आलेली आहे. तसेच दिवे दुरुस्तीसाठी लागणारे सर्व विदयुत साहित्य मनपाच्या मुख्य कार्यालया विदयुत कोठीकडून पुरविण्यात | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | येते. | |
| | | | **vi) स्ट्रीट लाईटच्या देखभालीवरील एकुण वार्षिक खर्च** | **आर्थिक व्यवस्थापन** - (संपुर्ण आर्थिक वर्षाचे नियोजन)<br>स्ट्रीट लाईटच्या देखभालीवरील एकूण वार्षिक खर्च<br>• कर्मचारी र.रु. २ ,९०,७४,१००.००<br>• सुटटे भाग व आवश्यक सामुग्री र.रु. ४,००,००.०००.००<br>• स्ट्रीट लाईट व्यवस्थे पासून प्राप्त महसूली उत्पन्न– नाही. | |
| | | | **vii) खर्च बचतीसाठी/उत्पन्न वाढविण्यासाठी केलेल्या उपायोजना** | संपुर्ण पुणे शहरात रस्त्यांवर करावयाच्या प्रकाश व्यवस्थेसाठी होणा–या वीज वापरामध्ये अत्याधुनिक उर्जा बचत फिटींग्ज दरवर्षी उपलब्ध अर्थशिर्षकीय तरतुदी नुसार बसविली जातात. विद्युत क्षेत्रामध्ये येणा–या नवनवीन तंत्रज्ञानाचा अभ्यास करून पुणे मनपाच्या कार्यक्षेत्रामध्ये योग्य असणा–या तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचा खात्याचा सतत प्रयत्न असतो. या अनुषंगाने इलेक्ट्रॉनिक फिडर पिलर, एल.ई.डी. / कॉस्मोप्लस दिवे या नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे खात्याचे धोरण आहे. यामुळे वीज वापरामध्ये अंदाजे २० ते ३० टक्के बचत झाली आहे. | |
| | | | **viii) किती अतिरिक्त उत्पन्न/बचत झाली** | स्ट्रीट लाईटींग मुळे महसुली उत्पन्न प्राप्त होत नाही. तथापि वापरण्यात येणा–या विजेच्या युनिटमध्ये सधारणपणे सरासरी २० ते३० टक्के बचत झाली आहे. | |
| **३.५** | **वाहनतळांची उपलब्धता** | १० | (१)शहरातील वाहन थांबे /वाहनतळांची संख्या | १३ | |
| | | | (२) वाहन पार्किंग क्षमता | १४४८ चार चाकी व ६९५१ दुचाकी | |
| | | | (३) पे ॲण्ड पार्क वाहन तळाची संख्या व क्षमता | १२ | |
| | | | (४)ट्रक्स,बस इत्यादी जड वाहन तळासाठी विशेष वाहन तळ | धनकवडी येथे ३०० ट्रकसाठी व पेटीट इस्टेट येथे बस साठी | |
| | | | (५) पे पार्किंगसाठी होणारा खर्च व मिळणारा महसूल | र.रू.४०.०० लक्ष | |
| **४** | **शहर सौंदर्यीकरण** | २० | (१) शहरातील सुशोभिकरण केलेल्या स्थळांची संख्या व तपशिल | पुणे शहरातील मुख्य रस्त्यांवरील रस्ते दुभाजक तसेच रस्त्याचेकडेने अनेक सुशोभिकरणाची कामे करणेत आली आहेत. | |
| | | | (२) खाजगीकरणामार्फत शहर सौंदर्यीकरणासाठी राबविण्यात आलेल्या प्रकल्पांची संख्या, प्रकल्पांचा तपशिल | खाजगीकरणामार्फत शहर सौंदर्यीकरणासाठी राबविण्यात येत आहेत. सोबत १२८ प्रकल्पांची यादी जोडली आहे (पुरवणी पाने ४७ ते ५६ ) | |
| | | | | | |
| **५** | **विकास** | | १)किती % आरक्षणे ताब्यात घेतली | ५२% | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **आराखड्याची अंमलबजावणी** | | २) जमीन ताब्यात घेण्याची कार्यपध्दती<br><br>३) टिडीआर( भूसंपादन/नगररचना योजनेमधून/इ)<br><br>४) आरक्षित प्लॉटच्या विकासासाठी केलेल्या प्रयत्नाचा तपशील | भूसंपादन कायदा ,नगर रचना कायदा व मुंबई प्रतिक अधिनियम १९४९ च्या कायद्या नवे आरक्षणाच्या मिळकती/ जमिनी तडजोडीने ताब्यात घेण्यात येतात या मध्ये संबंधीताना तडजोडी पोटी रेडीरेकनर दराने मोबदला देण्यात येतो अथवा एफ.एस.आय. किंवा टी.डी.आर देण्यात येतो.<br>टी.डी.आर हा नगर रचना कायद्यानुसार देण्यात येतो या मध्ये आरक्षीत जमिन /मीळकत पुणे महानगरपालिकेच्या नावावर जमा झाल्यानंतर टी.डी.आर देण्यात येतो.<br>आरक्षित प्लॉट पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात आल्यावर त्या प्लॉटच्या आरक्षणानुसार पुणे महानगरपालिके मार्फत त्या प्लॉटचे विकसन करण्यात येते. अथवा सदर प्लॉटवर आर-७ नुसार विकसन करण्यात येते | |
| ६ | **ग्राहक समाधान अहवाल** | १० | या संदर्भात नागरीकांचे सर्वेक्षण के ले आहे काय ? | सर्वेक्षण करण्यात आलेले नाही | |
| | | | असल्यास किती लोकांचे केले आहे. | -- | |
| | | | | | |
| | | | त्यापैकी किती नागरीक याबाबत समाधानी आढळून आले ? | -- | |
| | | | असमाधानी नागरीकांच्या तक्रारींच्या निवरणाकरीता करण्यात आलेल्या/येत असलेल्या उपाययोजना | . तथापी, पुणे महानगरपालिकेचे बेबसाईटवर तक्रार नोंदविण्याबाबत सोय करण्यात आली असून प्राप्त तक्रारींचे सुमारे ८०% पुर्तता करण्यात आली. तसेच पावसाळयाच्या कालावधीत २४ तक्रार निवारण केंद्र कार्यान्वीत करण्यात येते. जणेकरून पथ विभागासंदर्भात येणाऱ्या तक्रारींचे निवारण करणे शक्य होते. | |

.